पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ३२ दिनांक - १२/०१/२०२४**

फरासखाना पोलिस स्टेशन पुणे शहर

# सोन्याच्या दुकानातील चोरी करणा-या कामगार व त्याचे साथीदाराना २४ तासात फरासखाना पोलीस स्टेशनकडुन अटक

दिनांक ३१/१२/२०२३ रोजी रात्रौ ०८.०० वाजता ते दिनांक ०१/०१/२०२४ रोजीचे सकाळी १०.०० वाजेचे दरम्यान फिर्यादी नामे दिपक माने याचे ७९७ रविवार पेठ पुणे येथील राज कास्टींग नावाचे दुकान कुलूप लावुन बंद असतांना त्याचे दुकानामध्ये सध्या कामासाठी असलेले कामगार किंवा पुर्वी काम करत असलेल्या कामगारांपैकी कोणीतरी फिर्यादी यांचे दुकानाची व तिजोरीची बनावट चावी बनवून त्या चावीने दरवाजा उघडून दुकानामध्ये प्रवेश करुन दुकानामधील लोखंडी तिजोरी बनावट चावीने उघडून त्यामध्ये ठेवलेले एकुण ३,३२,०९,२२८/- चे ५ किलो ३२३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने व १०,९३,२६०/- रुपये रोख रक्कम फिर्यादी यांचे संमतीशिवाय चोरुन नेले बाबत दिलेल्या फिर्याद वरुन फरासखाना पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर ०३/२०२४ भादवि कलम ३८१ प्रमाणे दिनांक ०१/०१/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्हयाच्या तपासामध्ये फिर्यादीच्या दुकानातील कामगार नामे सुनिल कोकरे हा त्याची आजी वारल्याचे सांगुन त्याच्या गावाकडे दोन दिवसा पुर्वी गेल्याचे समजले होते.परंतु तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे निष्पन्न झाले की, सदर कामगार हा दोन दिवसांपासुन पुणे मध्ये असल्याचे व घटनेच्या वेळी घटनास्थळावर असल्याचे निष्पन्न झाले. तसेच आरोपी सुनिल कोकरे याच्या सोबत पुणे येथे राहणारा त्याचा मित्र अनिल गारळे हा सुध्या पुणे सोडुन बाहेर गावी गेल्याचे समजले.सदर बातमीच्या अनुषांगाने लागलीच वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली फरासखाना पोलीस स्टेशन कडील पोलीस उपनिरीक्षक श्री.निलेश मोकाशी व स्टाफ असे जत सांगली येथे तपासाकरता रवाना झाले. सदर पथकाने यातील मुख्य आरोपी सुनिल खंडु कोकरे व त्याचा साथीदार सिध्देश्वर ऊर्फ तानाजी राजाराम खांडेकर यास त्याच्या घरी कारंडेवाडी, ता-जत,जि-सांगली येथे ताब्यात घेऊन त्याच्याकडे गुन्हयाबाबत तपास केला असता त्याने सदर गुन्हा केल्याची कबुली दिली. सदरची चोरी त्याचे साथीदार अनिल गारळे व तानाजी खांडेकर यांच्या मदतीने केले असल्याचे सांगितले. परंतु गुन्हयातील मुद्देमाल हा त्यांचा दुसरा साथीदार अनिल गारळे याच्याकडे असल्याचे सांगुन तो सध्या कोल्हापुर येथे असल्याचे सांगितले. त्यावेळी फरासखाना पोलीस स्टेशनकडील पोलीस उपनिरीक्षक श्री.निलेश मोकाशी व पोलीस अंमलदार गणेश दळवी व प्रमोद मोहीते यांनी सदर आरोपींना ताब्यात घेऊन कोल्हापुर येथे गेले असता तेथे गुन्हे शाखा युनिट १, पुणे शहर चे सहाय्यक पोलीस निरीक्षक,श्री.अशिष कवठेकर व स्टाफ यांनी यातील आरोपी नामे अनिल गारळे यास ताब्यात घेतले होते. त्यानंतर दोन्ही पथकानी ताब्यात घेतलेल्या तिन्ही आरोपींकडे विश्वासात घेऊन तपास करता त्यांनी चोरलेला मुद्देमाल हा सुनिल कोकरे याच्याकडे असल्याचे सांगितले. त्यामुळे सदर आरोपींना घेऊन दोन्ही पथके सुनिल कोकरे याच्या घरी कारंडेवाडी, ता-जत, जि-सांगली येथे आले असता आरोपी सुनिल कोकरे याने चोरी केलेले सोने व रोख रक्कम घरा जवळील शेतातील हत्ती घासमध्ये लपवले असल्याचे सांगितल्याने तेथे पोलीसांनी आरोपीच्या शेतामधुन २ किलो ९८३ग्रॅम ५ मिलीग्रॅम सोने व ७,७३,०७०/- रुपये रोख रक्कम जप्त केली.

सदर आरोपींना दाखल गुन्हयात दिनांक ०२/०१/२०२४ रोजी अटक करण्यात आली. अटक आरोपींची पोलीस कस्टडी घेवुन त्यांच्याकडे उर्वरीत सोने व रोख रक्कम बाबत तपास करता ते काहिएक उपयुक्त माहिती देत नसल्याने फरासखाना पोलीस स्टेशनकडील सहाय्यक पोलीस निरीक्षक,श्री.वैभव गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक श्री.निलेश मोकाशी व पोलीस अंमलदार प्रमोद मोहीते,मल्लीकार्जुन स्वामी, संदीप कांबळे यांनी आरोपी सुनिल खंडु कोकरे याचे मुळ गावी जावुन त्याच्या घराची व शेताची झडती घेतली असता सदर झडतीमध्ये ४९७ ग्रॅम सोने व १,५०,०००/- रुपये रोख रक्कम शेतामध्ये लपवुन ठेवल्याचे मिळुन आल्याने ते पंचासमक्ष जप्त करण्यात आले आहेत. सदरचा मुद्देमाल हा आरोपी सुनिल कोकरे यांची आई राजश्री खंडु कोकरे, भाऊ अनिल खंडु कोकरे, नवनाथ खंडु कोकरे यांनी संगणमत करुन लपवुन ठेवल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने दाखल गुन्हयात भा.दं.वि कलम ४१४ प्रमाणे कलम वाढ करुन राजश्री कोकरे, अनिल कोकरे, नवनाथ कोकरे यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आली आहे. त्यांचेकडे दाखल गुन्हयातील उर्वरीत सोने व रोख रक्कमे बाबत काहिएक उपयुक्त माहिती देत नसल्याने सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.वैभव गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक श्री.निलेश मोकाशी व पोलीस अंमलदार प्रमोद मोहीते, वैभव स्वामी, प्रविण पासलकर, निर्मला शिंदे यांनी आरोपींना घेऊन त्यांच्या मुळ गावी जावुन बी.डी.डी.एस सांगली ग्रामिण व श्वान पथक सांगली ग्रामिण, डी.एस.एम.डी चे मदतीने आरोपीच्या घराची व घरा लगतचे शेतात शोध घेतला असता शेतातील एका पीव्हीसी पाईप मध्ये आरोपीने रोख रक्कम ५०,०००/- रुपये लपवुन ठेवलेली मिळुन आल्याने ती जप्त करण्यात आली आहे.

अशाप्रकारे दाखल गुन्हयाचे तपासात आरोपींकडुन एकुण ३ किलो ४८० ग्रॅम ५ मिलीग्रॅम सोने व ९,७३,०७०/- रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली आहेत. दाखल गुन्हयाचा अधिक तपास श्री वैभव गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक, फरासखाना पोलीस स्टेशन हे करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त,पुणे शहरा श्री.रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त (अति.कार्य.) श्री.रामनाथ पोकळे, मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे शहर, श्री.प्रविण पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ पुणे, श्री.संदीप सिंह गिल्ल, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त फरासखाना विभाग पुणे श्री.अशोक धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली फरासखाना पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.दादासाहेब चुडाप्पा, पोलीस निरीक्षक,गुन्हे शाखा युनिट १, पुणे शहर, श्री.शब्बीर सय्यद, पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री.मंगेश जगताप, सहाय्यक पोलीस निरीक्षक, वैभव गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा युनिट १, पुणे शहर, श्री.अशिष कवटेकर, पोलीस उप निरीक्षक निलेश मोकाशी, पोलीस अंमलदार मेहबुब मोकाशी, निर्मला शिंदे, प्रमोद मोहिते, गणेश दळवी, प्रविण पासलकर, वैभव स्वामी, किशोर शिंदे,सुमित खुट्टे,संदीप कांबळे,राकेश क्षीरसागर,समीर माळवदकर,गणेश आटोळे,पंकज देशमुख,तुषार खडके,अजित शिंदे,शशीकांत ननावरे,राहुल मखरे,अजय थोरात,अनिकेत बाबर,शशिकांत दरेकर,अर्जुन कुडाळकर यांच्या पथकाने केली आहे.

